## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- २४७२/२०२२

**अपिलार्थी, श्री.सदानंद एस. गणवीर**
अंबिका नगर, यवतमाळ ४४५ ००१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल,
वनपरिक्षेत्र (प्रादे.) कार्यालय पडघा, निजाई हॉस्पीटल समोर, पडघा, भिवंडी रोड, जि.ठाणे.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रराप व वन्य), ठाणे वनविभाग, ठाणे.
ता.जि.ठाणे.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २१.१०.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३१.०३.२०२२ | -- | ०९.०५.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. २२.०८.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने, आज पावेतो काहीच न कळविल्याने माहिती अप्राप्त असल्याने "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २१.१०.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.गणेश सोनटक्के, सहाय्यक वनसंरक्षक (रराप व वन्य.) ठाणे उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी श्री.शैलेश देवरे, वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र कार्यालय, पडघा उपस्थित आहेत.

*" माहे ०१ मार्च २०२२ पासून ते ३१ मार्च २०२२ पावेतो या महिन्यात आपल्या रेंज कार्यालयाने संबंधित उपवनसंरक्षक वनविभागाकडून शासनाच्या योजनेअंतर्गत कामाकरीता प्राप्त एकुण धनादेशावरील रकमेची माहिती तसेच प्राप्त एकुण धनादेशाच्या रकमा कशा खर्ची घातल्या त्या रोखलेखा पुस्तीकेची माहिती तसेच बिल व बिलाच्या व्हाऊचरसह छायाप्रती उपलब्ध करुन देण्याबाबत.*

*१) १ मार्च २०२२ पासून ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत उपवनसंरक्षक वनविभाग ठाणे कार्यालयाकडून एकुण प्राप्त धनादेशाच्या रकमा कशा खर्ची घातल्या त्या रोखलेखा पुस्तीकेची सविस्तर माहिती व त्याचे बिल व बिलाचे व्हाऊचरची माहिती साक्षांकित छायाप्रतीत उपलब्ध करुन देण्यात यावी.*

*२) १ मार्च २०२२ पासून ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत आपल्या रेंज कार्यालयाने उपवनसंरक्षक वनविभाग ठाणे कार्यालयाकडून एकुण प्राप्त रकमेची माहिती/RTGS द्वारा एकुण प्राप्त रकमेची माहिती जसे RTGS चा नंबर त्यावरील रक्कम व त्याचा दिनांक व बँकेच्या नावाची माहिती साक्षांकित छायाप्रतीत उपलब्ध करुन देयात यावी."*

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीस उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे लेखी निवेदन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्याने दि.१३.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये माहितीच्या अभिलेखाची तपासणी करण्यासाठी दि.२२.०४.२०२२ रोजी सायं १६.३० वाजता वनपरिक्षेत्र कार्यालय, पडघा येथे उपस्थित राहणेबाबत कळविले होते. परंतु अपिलार्थी अद्यापपावेतो उपस्थित झाले नाहीत. त्याचप्रमाणे अपिलार्थी हे प्रथम अपिलाच्या सुनावणीमध्ये सुध्दा उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे त्यांना मागणी केलेली माहिती प्रत्यक्षात देण्यात आली नाही. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्याने, चलन भरणा केल्याशिवाय संबंधितांना माहिती पुरविण्यात आली नाही. त्याचप्रमाणे

अपिलार्थी हे अशा प्रकारचे अर्ज वारंवार करत असून, त्याबाबत अपिलार्थी यांना पत्रव्यवहार केला असता, त्यांचेकडून कोणताही पत्रव्यवहार होत नाही, असेही नमूद केले.

या ठिकाणी जो मुद्या उपस्थित झाला तो असा की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असून, अशी माहिती जन माहिती अधिकारी यांना मोठ्या प्रमाणात साधनसामाग्री या कामासाठी वळवावी लागणार आहे. आता जी माहिती जन माहिती अधिकारी यांनी तयार करुन आणलेली आहे ती २०९ पृष्ठांची आहे. म्हणजेच ही विस्तृत स्वरुपाची माहिती आहे, असे म्हणता येणार नाही. म्हणजेच अपिलार्थी यांना सदरची माहिती विस्तृत स्वरुपाची आहे, असे कळवून त्यांना हेतूपुरस्सर कार्यालयात बोलावून माहिती पासून वंचित ठेवण्याचा जन माहिती अधिकारी यांचा हेतू दिसून येत आहे.

यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहितीपैकी वैयक्तीक स्वरुपाची माहिती वगळून, उर्वरित संपूर्ण माहिती पुरविणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश देवरे, वनक्षेत्रपाल पडघा यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शैलेश देवरे, वनक्षेत्रपाल, पडघा, ता.भिवंडी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ३१.०३.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन सदरची माहिती ही विस्तृत स्वरुपाची आहे, असे कारण सांगून माहिती पुरविण्यास विलंब केल्यामुळे, त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०९.१२.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ ऑक्टोबर, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी री.शैलेश देवरे,
वनक्षेत्रपाल,वनपरिक्षेत्र (प्रादे.) कार्यालय पडघा,
निजाई हॉस्पीटल समोर, पडघा, भिवंडी रोड, जि.ठाणे.